

## घ्यावयाची काळजी

१) 'साधना संत्रा स्पेशल' फवारणी मिश्रणाचे चांगले परिणाम मिळण्याकरिता त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बुरशीनाशक किटकनाशक टाकू नये.

२) फवारणी सकाळी ६ ते ११ व सायं ४ ते ६ या वेळेत करावी.

३) फवारणी करतांना झाडांची पाने व फळे पूर्णपणे ओली होतील या पध्दतीने फवारावे.


**योगदान**

**डॉ. के.पी. सिंह**
विषय विशेषज्ञ (पीक संरक्षण)
कृषि विज्ञान केंद्र, दूर्गापूर (बडनेरा)
जि. अमरावती (महा.)
मो. ९६३७७१७८१८, फोन: ०७२१-२५८०३४२

**संकलन**

**अश्विनी पोतदार, अविनाश राऊत**
**महेंद्र न्यायखोर**


**संदर्भ**

**भारतीय बागवानी अनुसंधान संस्थान**
**बँगलोर (कर्नाटक)**

## विक्रिकरीता उपलब्ध

### जैविक खते




### जैविक किडनाशके



### सुक्ष्म अन्नद्रव्य




भाकृअनुप
ICAR

SSAMT



SADHANA
# SANTRA
Special

## निंबुवर्गीय फळांचे जास्तीत जास्त उत्पादन व गुणवत्तेसाठी सुक्ष्म अन्नद्रव्य

*Foliar Spray*


Manufactured & Marketed by :
**KRISHI VIGYAN KENDRA**
Durgapur (Badnera), Dist. Amravati.

Technology Developed Licensed by :
Indian Institute of Horticultural Research (IIHR) Bengaluru
(Indian Council of Agricultural Research (ICAR) New Delhi)



# निंबुवर्गीय फळांचे जास्तीत जास्त उत्पादन व गुणवत्तेसाठी सुक्ष्म अन्नद्रव्याचा वापर गरजेचा

बागवानी पिकांच्या उत्पादनात व गुणवत्तेत सूक्ष्म अन्नद्रव्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. देशभरात बहुतांश माती मध्ये झिंक, बोरॉन, लोह यासारख्या सुक्ष्म अन्नद्रव्या प्रमाणेच नायट्रोजन, फॉस्फोरस, पोटॅश सारख्या पोषकतत्वाची कमरता असते. या पोषकतत्वाच्या कमतरतेमुळे ५०% पेक्षा जास्त पिकांची हानी होते. संपुर्ण देशभरात घेण्यात येणाऱ्या पिकांमध्ये निंबुवर्गीय पिक मुख्य पिक म्हणुन ओळखले जाते व सुक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे उत्पादनात व गुणवत्तेत होणारी हानी सर्वसाधारण आहे. व त्यास वरिल अन्नद्रव्यांची कमतरता कारणीभुत आहे हे आढळून आले व या समस्येचे समाधान व गुणवत्ता निश्चित करण्याकरिता भारतीय बागवानी अनूसंधान संस्थान, बँगलोर यांच्या योगदानाने एक सुक्ष्म पोषकतत्व म्हणजेच सुक्ष्म अन्नद्रव्य विकसीत केजे जे **'साधना संत्रा स्पेशल'** या नावानी ओळखले जाते तसेच फवारणीच्या या तंत्रज्ञानाचे प्रमाणीकरण केलेले आहे.

## 'साधना संत्रा स्पेशल' या बद्दल आपल्याला माहिती आहे काय ?

'साधना संत्रा स्पेशल' हे सुक्ष्म पोषकतत्व असलेले एक मिश्रण आहे त्यामध्ये झिंक, लोह, बोरॉन, कॉपर व मँगनिज इत्यादी घटक समाविष्ठ



केलेले आहेत. निंबुवर्गीय फळ पिक घेतल्या जाणाऱ्या विविध क्षेत्रातील विस्तृत सर्वेक्षण, माती परिक्षण त्याच्याबरोबर सुक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता व निंबुवर्गीय झाडाच्या पानांच्या परिक्षणाच्या आधारावर पोषकतत्वांचे ग्रहन व पोषकतत्वाकरिता झाडाची भूक ओळखून भारतीय बागवानी अनुसंधान संस्था बँगलोर यांनी सामान्यतः निंबुवर्गीय फळ पिकांचे उत्पादन होणाऱ्या विभिन्न मातीकरीता एक अविष्कारी पोषकतत्व मिश्रण तयार केलेले आहे. निंबुवर्गीय फळ स्पेशल मिश्रणाचा लाभकारी प्रभाव फवारणीच्या ७२ तासा नंतर लगेच झाडावर दिसुन येतो.

## 'साधना संत्रा स्पेशल' ची फवारणी कशी कराल ?

निंबुवर्गीय फळ पिकांचे उत्पादन व गुणवत्ता वाढवण्याकरीता सुक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर महत्वपूर्ण आहे निंबुवर्गीय फळझाडांना झिंक, बोरॉन, लोह, मँगनीज व कॉपर इत्यादी घटकांच्या कमतरतेमुळे झाडाच्या प्रकाश-संश्लेषण प्रक्रियेत ५०-७० टक्के घट येते. परंतु साधना संत्री स्पेशलची झाडावर फवारणी झाडाच्या पानांना प्रकाश संश्लेषण प्रक्रियेकरिता पोषकतत्व उपलब्ध करते. तसेच दिल्या गेलेल्या पोषकतत्वांचे मातीमध्ये खडे बनन्यापासुन वाचवते. माती सोबत पोषकतत्व वाहून जाण्यास थांबवते व झाडाची पोषकतत्वासाठीची गुप्त भुक क्षमवते आणि चांगल्या रंगासोबत फळांची साईज वाढवते.



## फवारणी कधी कराल ?

झाडांची वाढ व विकासा दरम्यान सुक्ष्म पोषकतत्व आवश्यक असतात बहुतेक वेळा पानांवर 'साधना संत्रा स्पेशल' फवारणीचा प्रभाव दिसून येतो. एकंदरीत 'साधना संत्रा स्पेशल' ची झाडांवर कमीत कमी तिनदा व वाढीच्या (अवस्थेत) मौसमात एका वर्षाला दोनदा फवारणी करावी किंवा १ ली फवारणी बहार येण्यापुर्वी, २ री फवारणी पहिल्या फवारणीच्या एक महिन्यांनतर व ३ री फवारणी २ या फवरणीच्या एक महिन्यानंतर म्हणजेच फळाच्या विकासादरम्यान फवारणी केल्यास फाळाचा आकार व रंगाची गुणवत्ता वाढते.

## कसे तयार करावे व फवारावे ?

फवारणीचे मिश्रण तयार करण्याकरिता ७५ ग्रॅम 'साधना संत्रा स्पेशल' १५ लिटर पाण्यात मिसळून ३ मि.ली. साबनाचे पाणी किंवा ३ श्यॉम्पू पाऊच (प्रति १ रु. पाऊच) व २ लिंबाचा रस मिसळून एकसारख द्रावण तयार करावे, व वर दिलेल्या वेळेप्रमाणे पानांवर व फळांच्या गुच्छांवर फवारणी करावी.

फवारणी झाडाच्या पानांच्या खालच्या बाजूने करावी व फळांचे गुच्छावर फवारणी करुन त्यास ओले करावे. चांगल्या परिनामांसाठी फवारणी सकाळी ६ ते ११ किंवा ४ ते ६ या वेळेत करावी जेणेकरुन सुर्याच्या किरणांमुळे किंवा उष्णतेमुळे पोषकतत्व नाश पावनार नाही. फवारणीच्या वेळेचे असे नियोजन करावे की फवारणी नंतर कमित कमी २४ ते ३६ तासांच्या आत पाऊस येता कामा नये.